मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
५३३०

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय वा० वा०
दा. क्र. ५३३०

IRBK-0105330
IRBK-0105330

# देव दर्शन

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय धा. वा.
दा. क्र. ५३३०



विजय प्रकाशन

दा.क्र.-५३३०.

# देव दर्शन

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

— लेखक —

प्रभाकर विष्णु बेंद्रे

५३३०
किंमत ...

IRBK-0105330

विजय प्रकाशन—मुंबई १२

: प्रकाशक :
रा. सा. सारंग,
बी. आय्. टी. चाळ, नं. ४
परळ, मुंबई १२

आवृत्ति पहिली, सन १९५५

( सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन )

: मुद्रक :
कृष्णाजी नारायण सापळे,
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस,
रुक्मिणी निवास, मोरबाग रोड,
दादर, मुंबई १४

# अंगठीचा सेवक

एक खेडेगांव होतें. त्या गांवांत एक श्रीमंत सावकार राहत होता. तो गांवांतील गरीब शेतकऱ्यांना फार त्रास देत होता. सर्व शेतकरी सावकारीपाशानें कंटाळून गेले होते. रायबा हा त्यांपैकींच एक शेतकरी होता. तो सावकाराच्या बोजांतून सुटण्यासाठीं गांवाच्या बाहेर एका घनघोर अरण्यांत गेला व आत्महत्या करण्याच्या तो विचारांत होता. परंतु दैवांत असल्याशिवाय मृत्यु थोडाच येतो!

याच वेळीं एक राजपुत्र घोड्यावर बसून, शिकारीसाठीं त्या अरण्यांत आला होता. त्याला हरणाची शिकार सांपडल्यामुळें तो फार आनंदांत होता. त्यानें दुःखीकष्टी झालेल्या रायबास विचारलें, ' तूं कोण आहेस व काळजींत कां आहेस ? ' रायबानें झालेला सर्व वृत्तांत सांगितला व शेतकऱ्यांचें आयुष्य किती कष्टमय असतें हेंहि त्या राजपुत्रास पटवून दिलें. राजपुत्राला गरीब शेतकऱ्याची दया आली व त्यानें आपल्या बोटांतील सुंदर आंगठी त्यास काढून दिली व तो म्हणाला, ' ही आंगठी घेऊन तूं आपलें संकट टाळ. ' राजपुत्राला ती आंगठी जादूची आहे हें माहीत नव्हतें व रायबाला सुद्धां माहीत नव्हतें. रायबानें आनंदानें ती आंगठी घेतली व राजपुत्राला मुजरा केला. नंतर तो लवकरच आपल्या कुटुंबांतील मंडळींत येऊन दाखल झाला. सर्व घरांतील मुलांबाळांना अत्यानंद झाला.

रायबानें आपल्या बायकोला ती आंगठी दाखविली व सर्वानुमतें ती विकावी असें ठरलें. लगेच रायबानें आपल्या मुलाजवळ ती आंगठी देऊन सांगितलें, ' शिवबा, ही आंगठी एखाद्या श्रीमंत सावकारास विकत दे. म्हणजे त्या पैशांत आपण आपलें उरलेलें आयुष्य सुखानें काढूं.'

पहाट झाली. रायबा उठला. कोंबडे कुकूच ऽऽ कू करूं लागले. पक्षी किलबिल करूं लागले. सूर्य वर येऊं लागला. शिवबानें खांद्यावर गाठोडें ठेवलें व बोटांत आंगठी घातली व काट्याकुट्यांतून मार्ग काढीत तो पुढें चालूं लागला. सुमारें दुपारच्या वेळेस तो शहरांत येऊन दाखल झाला. थकल्यामुळें तो क्षणभर विसाव्यासाठीं एका दगडावर झाडाच्या दाट सावलींत बसला. वारा झुळझुळ वहात होता. झऱ्याचें पाणी खळखळ करीत होतें. शिवाला हुषारी आली. त्यानें सहज आंगठी आपल्या हातावर चोळली, तोंच काय चमत्कार झाला !—

एक भयंकर अक्राळविक्राळ स्वरुपाचा कोळशाहून काळा असा अडदांड माणूस समोर उभा राहिला व म्हणाला, ' काय आज्ञा आहे ? ' त्याला पाहतांच शिवबा भयभीत झाला व धाडकन् जमिनीवर मूर्छित पडला. परंतु हा अडदांड गृहस्थ त्या आंगठीचा चाकर होता. थोड्या वेळांनें शिवबा शुद्धीवर आला. त्याला धीर आला. चाकर म्हणाला, ' काय आज्ञा आहे ? ' शिवबा म्हणाला, ' माझ्या आईबापांना राहावयास एक सुंदर राजवाडा बांधून दे. घालावयास भरजरीचे कपडे आणून दे व खावयास पक्वान्नांनीं भरलेलीं ताटें आणून

दे. मलाहि या सर्व गोष्टी आणून दे.' सेवकानें आज्ञेप्रमाणें सर्व गोष्टी केल्या.

इकडे रायबानें भरजरीचे कपडे घातले. त्याची बायको सुंदर साडी नेसली व दोघेंहि सोन्याच्या झोपाळ्यावर बसलीं! मधूनमधून गोड फळें व पक्वान्नांचा एक एक घांस उचलून खाऊं लागलीं. त्यांना ह्या सर्व चमत्काराचें आश्चर्य वाटत होतें; आपल्या प्रेमळ शिवबाचें भान सुद्धां राहिलें नव्हतें. इतक्यांत शिवबानें पुन्हा आंगठी चोळली; व सेवकाला म्हटलें, 'मला माझ्या आईबापाजवळ घेऊन चल.' लगेच शिवबा उत्तम भरजरी कपडे घालून आपल्या आईबापांच्या जवळ जाऊन बसला व फळें खाऊं लागला! खातां खातां त्यानें या जादूच्या आंगठीची घडलेली हकीकत सांगितली. आतां रायबाला आंगठी विकण्याची चूक ध्यानांत आली. ती सर्व मंडळी सुखानें राहूं लागली.

शिवबाचें एका राजकन्येशीं लग्न लागलें. त्याची बायको फार सुशील व सद्गुणी होती. राजा मरण पावल्यावर सर्वानुमतें शिवबा गादीवर बसला व त्यानें मरेपर्यंत प्रजेची अंतःकरणापासून सेवा केली. सर्व लोक आनंदी झाले.

त्या सावकाराला मात्र ओशाळल्यासारखें झालें. त्यानेंच काय, शिवबाच्या राज्यांतील सर्व सावकारांनीं आपला दुष्टपणा सोडून दिला!

---

# समईशीं लग्न

चंद्रकांत नांवाचा एक राजा होता. त्याला एक मुलगी होती. तिचें नांव प्रतिभा. प्रतिभेचें एखाद्या सुंदर राजपुत्राशीं लग्न करावें असें राजास नेहमीं वाटे.

प्रतिभा रोज सकाळीं उठत असे. नंतर आपल्या राजवाड्यांतील उपवनांत फिरत असे. उपवनांत मोठमोठीं फळांचीं व फुलांचीं झाडें होतीं. प्रतिभा रोज सकाळीं दूधभात जेवत असे. तिला दूधभात फार आवडे. भात जेऊन झाल्यावर सांडलेलीं शितें ती आपल्या उपवनांत टाकीत असे. असें करतां करतां त्या उपवनांत एक दूधभाताचें झाड उगवलें. राजाला व राजकन्येला तें झाड पाहून फार आनंद झाला.

राजानें प्रतिभेच्या लग्नासाठीं एक पण लावला. तो असा—'जो राजवाड्याच्या उपवनांतील नवीन उगवलेलें झाड कसलें आहे तें ओळखील त्यासच मी माझी मुलगी देईन.' सर्व नगरांत पणाची बातमी पसरली. ठिकठिकाणच्या राजपुत्रांना व संस्थानिकांना आमंत्रणें देण्यांत आलीं. ठरलेल्या दिवशीं राजवाड्यांत अनेक राजपुत्र, संस्थानिक, प्रधानपुत्र, सरदार लोक, सर्व आपापल्या ऐपतीप्रमाणें भरजरी कपडे व अलंकार घालून पण जिंकण्यासाठीं उपस्थित झाले. राजवाड्यांत फुलांच्या माळा लावण्यांत आल्या. तोरणें बांधण्यांत आलीं. तुताऱ्या वाजविण्यांत आल्या. सर्वांनाच आनंद झाला होता. राजानें राजमहालांतून सुंदर भाषण केलें व पणास सुरवात झाली. प्रतिमा नटून थटून

आपल्या महालांत बसली होती. कोण पण जिंकील, याबद्दल राजा चिंतातुर झाला.

एक राजपुत्र म्हणाला, 'महाराज, सुवासिक गुलाबाचेंच झाड आहे तें.' दुसरा म्हणाला, 'डाळिंबाचें किंवा फणसाचेंच झाड असेल.' तिसरा म्हणाला, 'मोगरा किंवा चांफा असेल.' अशा तऱ्हेनें हरतऱ्हेच्या फळाफुलांचीं नांवें सांगण्यांत आलीं पण व्यर्थ. पण कोणीच जिंकीत नाहीं, असें राजास वाटलें. व तो पुन्हा सचिंत झाला. आपण इतका अवघड पण टाकला याबद्दल राजास वाईट वाटलें. सर्वत्र शांतता पसरली होती. पण कोण जिंकणार ? त्याच राजवाड्यांत उपवन झाडण्यासाठीं एक नोकर ठेवण्यांत आला होता. त्याचें नांव विठू.

रोज उपवनांत भाताचीं शितें पडलेलीं त्याला अनेक वेळां दिसलीं होतीं. त्यानें तर्क केला,—'खरंच, हें दूधभाताचेंच झाड असलें पाहिजे.'

सर्व राजवाड्यांत शांतता पसरली होती. इतक्यांत विठू तेथें आला व राजास मुजरा करून म्हणाला, 'महाराज, मी सांगूं का नवीन झाडाचें नांव.' राजास वाटलें, एवढे मोठे मोठे राजपुत्र, प्रधानपुत्र, संस्थानिक, सरदार, पण जिंकूं शकले नाहींत तर हा नोकर काय सांगणार ? राजानें विठूस सांगितलें, 'सांग बरें विठू'—'महाराज, दूधभाताचें तें झाड असलें पाहिजे.' विठूनें उत्तर दिलें. त्याचें उत्तर ऐकून राजास फारच आश्चर्य वाटलें. इतर लोकांसहि अतिशय आश्चर्य वाटलें.

प्रतिभेला तर फारच दुःख झालें. आपलें लग्न केवळ एका नोकराशीं होणार हें ऐकून तिला अतोनात दुःख झालें.

राजासहि वाईट वाटलें. परंतु पण कसा मोडतां येईल ? शेवटीं राजास एक युक्ति सुचली. त्याचेजवळ एक मोठी सोन्याची समई होती. त्या समईला आंत मोठमोठे दोन कप्पे होते. त्यांत एका माणसाला सहज लपून बसतां येईल इतकी जागा होती. हवा येण्यासहि वरचे बाजूस लहानशी खिडकी होती. आंत कुलूप लावण्याचीहि सोय होती. राजानें ती समई व इतर भांडीं त्या नोकरास दिलीं व राजकन्येचें त्याच्याशीं लग्न झालें. विट्ठला फारच आनंद झाला. पण—

लग्न झाल्यावर दुसऱ्याच दिवशीं प्रतिभा आपल्या समईंत जाऊन लपून बसली. विट्ठनें घरीं आल्यावर राजकन्येचा शोध केला, राजासहि विचारलें, गांवांतील प्रमुख अधिकाऱ्यांसहि विचारलें. परंतु राजकन्येचा शोध लागेना. शेवटीं तो निराश झाला. त्यानें मनांत विचार केला—' जर राजकन्याच नाहीं, तर राजवस्त्रें आणि हीं भांडीं आपणांला काय करावयाचीं आहेत ? ' असा विचार करून त्यानें तीं सर्व भांडीं व समई प्रधानास विकलीं.

प्रधानानें ती समई व इतर भांडीं विकत घेतलीं. नंतर एके दिवशीं प्रधानपुत्र ' विलास ' डोक्याला पट्ट्या बांधून निजून राहिला. प्रधानानें आपला मुलगा खिन्न झालेला पाहून त्याला विचारलें, 'विलास, काय होतंय तुला ? डोकें कां दुखत आहे ?'

तरी त्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. त्याच्या आईनें त्याची पुष्कळ समजूत घातली परंतु व्यर्थ. शेवटीं प्रधान अगदीं काकुळतीनें म्हणाला, 'बाळ, तुझ्यासाठीं आम्ही प्राणदेखील देण्यास तयार आहों. परंतु तुझ्या मनांत काय आहे तें तरी सांग मला—'

शेवटीं विलास म्हणाला, 'माझी एकच विनंती आहे. ती तुम्हीं पूर्ण केलीच पाहिजे.'

प्रधान म्हणाला, 'सांग, आम्ही ती पूर्ण करूं.'

विलासनें उत्तर दिलें, 'मला त्या विकत घेतलेल्या समईशीं लग्न करावयाचें आहे'.—

हें ऐकून प्रधान म्हणाला, 'तुला वेड तर लागलें नाहीं ? अरे, समईशीं का कुणी लग्न करतात ? '

विलास म्हणाला, 'तें कांहीं नाहीं, तुम्हीं मला वचन दिलें आहे.'

शेवटीं नाईलाजास्तव प्रधानानें लग्नास संमती दिली. विलासचें त्या समईशीं लग्न लावण्यांत आलें. समईशीं लग्न केल्याबद्दल सर्वांनींच त्याला दोष दिला. परंतु त्या समईची कथा त्याला एकट्यालाच माहीत होती. लग्न लागल्यानंतर समईतून प्रतिभा नटून थटून बाहेर आली. समईतून राजकन्या निघालेली पाहतांच सर्वांसच आश्चर्य वाटलें. प्रधानपुत्रास सर्वांनींच शाबासकी दिली. प्रतिभाहि सुखी झाली. त्यांचें मोठ्या थाटा-माटानें लग्न लावलें व तीं दोघेंहि सुखी झालीं !

---

# हुशार न्यायाधीश

एका गांवांत एक अत्यंत श्रीमंत सावकार होता. त्याचे जवळ बरेंच धन होतें. शिवाय घरेंदारें व शेतीहि होती. तसेंच गांवाचे बाहेर एका नदीकांठीं त्याचें एक घर होतें. तेथेंच तो राहत असे. त्याचे घरीं पुष्कळ नोकरचाकर होते. त्यांतील कांहीं विश्वासू होते, तर कांहीं लबाड, कांहीं प्रेमळ तर कांहीं रागीट.

शेतीचे कामासाठीं सावकार कधीं कधीं बाहेर गांवीं जात असे व आपलें सारें घर आपल्या नोकरांवर सोपवून देत असे. असाच तो एके दिवशीं कांहीं कामासाठीं बाहेरगांवीं गेला होता जातांना त्यानें नोकरांस सांगितलें कीं 'बाबांनो घराकडे लक्ष असूं द्या. मी दोन दिवसांत परत येईन. चोरी वगैरे होण्याचा संभव आहे, तेव्हां जरा जास्त लक्ष ठेवा.' त्यानंतर सावकार बाहेरगांवीं गेला.

दोन दिवसांनीं सावकार परत आल्यावर त्याला असें आढळून आलें कीं आपल्या तिजोरींतील पैशाचें पाकीट व कांहीं दागिने चोरीस गेले आहेत. त्याला आपल्या नोकरांच्या वागण्याचा संशय आला. त्यानें प्रत्येकास दरडावून विचारलें, 'कायरे, खरें सांग, नाहींतर पोलीसाचे तावडींत देईन. बोल, कुणी चोरलें पाकीट ?' परंतु कोणीच कबूल होईना. जो तो म्हणूं लागला, 'महाराज, आज इतकीं वर्षे झालीं, आम्हीं तुमची सेवा केली आणि आजच आमच्या हातून असें कसें

होईल बरें ? आमच्यावर तुमचा विश्वास नाहीं का ?' खरा चोर कसा आपला गुन्हा कबूल करणार ? कुणीहि चाकर कबूल झाला नाहीं. सावकार अगदीं निराश झाला. शेवटीं नाइलाजानें त्यानें ही गोष्ट न्यायकचेरींत नेली.

ठरलेल्या दिवशीं सगळ्या चाकरांना न्यायाधीशापुढें उभें करण्यांत आलें. न्यायाधीश मोठा चतुर आणि हुशार होता. तो म्हणाला, 'बाबांनो, मुकाट्यानें आपला गुन्हा कबूल करा. मी तुम्हांस सोडून देईन.' परंतु एकहि चाकर कबूल झाला नाहीं. जो खरा चोर होता तो मात्र दचकला.

पुरावा नसल्यामुळें न्यायाधिशानें एक युक्ति योजिली. त्यानें प्रत्येक चोरास एक लाकडी बाहुली दिली व तो म्हणाला, "ऐका, तुम्हांपैकीं प्रत्येकास मी ही लाकडी बाहुली देत आहें. ही बाहुली जादूची आहे. तुम्हांपैकीं जो खरा चोर असेल त्याची बाहुली सात दिवसांत सात इंच उंच वाढेल; व बाकीच्यांच्या बाहुल्या जशाच्या तशाच राहतील. सातवे दिवशीं या बाहुल्या घेऊन तुम्ही सारे पुन्हां कोर्टांत या. जा."

सावकाराचे दागिने व पाकीट ज्यानें चोरलें होतें त्याचें नांव सावळ्या. त्याला त्या दिवसापासून चैन पडलें नाहीं. झोंपहि लागेना. त्याला वाटलें, आतां काय करावें ? आपणास शिक्षा होणार! त्याचें मन त्याला खाऊं लागलें. त्याला एकदां वाटे–'आपण गुन्हा कबूल करावा.' पुन्हा वाटे 'छे, जें होईल तें होवो.'—

शेवटीं त्यानें एक युक्ति केली. त्याला वाटलें, ' आपली बाहुली नक्की सात इंच उंच होणार. त्यापेक्षां ती सात इंच कमीच केली तर ? ' त्यानें तसेंच केलें. त्यानें ती बाहुली सात इंच कापून टाकली ! आतां त्याला बरें वाटलें.

ठरलेल्या दिवशीं सारे चाकर आपापल्या लाकडी बाहुल्या घेऊन कोर्टांत हजर झाले. न्यायाधिशानें प्रत्येकास आपली बाहुली दाखविण्यास सांगितलें. सर्वांच्या बाहुल्या जशाच्या तशाच होत्या. न्यायाधिशानें सावळ्यास बाहुली दाखविण्यास सांगितलें. त्याची बाहुली इतरांपेक्षां सात इंचानें कमी झालेली न्यायाधिशास दिसली. त्यानें खरा चोर सावळ्या आहे, असा निकाल दिला. तो म्हणाला—

' बाबांनो ऐका. या लाकडी बाहुल्या म्हणजे केवळ तुमची परीक्षा पहाण्याचे हेतूनेंच मी तुम्हांस दिल्या होत्या. त्या जादूच्या नव्हत्या. परंतु सावळ्या खरा चोर असल्यामुळें त्याला वाटलें ही बाहुली खरंच सात इंच उंच वाढेल; म्हणून त्यानें ती सात इंच कमी केली. पहा, तुमच्या इतरांच्या बाहुल्या जशाच्या तशाच आहेत व त्याची बाहुली मात्र सात इंचानें कमी झालेली आहे. यावरून तो चोर आहे हें सिद्ध झालें.'

सावळ्यास मोठी शिक्षा झाली. सावकारास आपले दागिने व पैशाचें पाकीट परत मिळालें. जो तो न्यायाधिशाच्या चातुर्याची प्रशंसा करूं लागला.

---

५५५०
का-वा.



# बोलकें कुत्रें

फार वर्षापूर्वीची गोष्ट. श्रीकान्त नांवाचा एक राजा होता. अतिशय शूर, अत्यंत प्रेमळ वीर होता तो.

सर्व प्रजा सुखी होती त्याची. सर्वत्र शांतता, आनंद आणि आरोग्य नांदत होतें. दोन राण्या होत्या त्याला. एक आवडती आणि एक नावडती. नावडतीला एक मुलगा होता. त्याचें नांव आनंद.

एकदां सहज राजा प्रवासासाठीं निघाला. जातांना त्यानें प्रत्येक राणीस विचारलें, येतांना तुला काय काय आणूं ?' आवडतीनें सांगितलें, 'चंद्रहार आणा.' नावडतीनें सांगितलें, ' वज्रटीका आणा.'

त्यानें आनंदास विचारलें, 'बाळ, तुला काय पाहिजे ?'

आनंद म्हणाला—'बोलकें कुत्रें आणा मला लहानसें.''

राजा प्रवासास निघाला. दूर दूर गेला. त्यानें सातहि समुद्र ओलांडले. तो एका खेड्यांत शिरला.

तेथें एक सोनार राहत असे. त्याचेजवळ सुंदर सुंदर सोन्याचे दागिने होते. राजानें एक चंद्रहार आणि वज्रटीका घेतली.

राजा पुढें चालूं लागला. राजानें जातांना सोनारास विचारलें, ' कायरे, बोलकें कुत्रें कुठें मिळेल का ? '

सोनार म्हणाला, ' मिळेल, पण फार त्रासानें.'

'सोनारानें सांगितलें, 'पलिकडेच एक जादुगारीण आहे. तिच्याजवळ एक बोलकें कुत्रें आहे. जा तूं तेथें.'

राजा म्हातारीच्या झोपडींत गेला. त्यानें रात्रीं तेथेंच मुक्काम केला. त्यानें विचारलें, 'आइ, एखादें बोलकें कुत्रें आहे का तुझ्याजवळ?' म्हातारीनें उत्तर दिलें 'नाहीं.'

रात्र झाली. म्हातारी निजली. राजाहि निजला. तोंच एक कुत्रें राजाचे अंगावर खेळूं लागलें.

राजा दचकून उठला. कुत्रें बोलूं लागलें. 'राजा, उठ लवकर. मला दूर घेऊन चल. ही म्हातारी मला फार फार छळते.'

मध्यरात्रीचा सुमार होता. राजा कुत्र्यास घेऊन परत आपल्या देशाकडे गेला.

कुत्रें पाहतांच आनंदास आनंद झाला. अगदीं प्रेमळ कुत्रें होतें तें. खूप खूप बोले, आणि तेंहि गोड गोड. त्याचें नांव मोत्या. मोत्या सर्वांशींच खूप खूप बोले. हंसे आणि खेळे.

सकाळ झाली. म्हातारी उठली. कुत्रें नाहीं असें पहातांच ती खवळली. चिडली. एक हाडाची कांडी घेऊन ती राजाच्या पाठोपाठच आली. आली ती राजमहालांत शिरली.

'राजा, तूं चोर आहेस. कुत्रें आण माझें. नाहींतर भस्म करीन तुला.'

राजा भयभीत झाला. म्हातारीनें हाडाची कांडी फिरवून राजास भस्म केलें.

इतक्यांत आनंद हातांत कंदील घेऊन आला. त्यानें तो कंदील म्हातारीस दाखवतांच म्हातारी भस्म झाली. हाडाची कांडी तुटून पडली. राजा पुन्हां जिवंत झाला. सर्वांनाच नवल वाटलें आणि सर्वांत आश्चर्य काय ? मोत्याच्या ठिकाणीं एक सुंदर तरुणी निर्माण झाली ! पण हें घडलें कसें ?

मोतीनें आनंदला सांगितलें होतें कीं जादुगारीण म्हातारी हाडाची कांडी घेऊन इकडे येईल. तिनें हाडाची कांडी फिरविली कीं राजा भस्म होईल. म्हणून तूं जळता कंदील तिच्या समोर धर, म्हणजे तीच जळून भस्म होईल. मग राजा पुन्हा जिवंत होईल व माझ्या शरीरांतून एक लावण्यवती राजकन्या निर्माण होईल.

आनंद मोठा झाल्यावर त्यानें त्याच सुंदर राजकन्येशीं लग्न लावलें.

# कसोटी

एक सुंदरसें खेडें होतें. त्या खेड्यांत अनेक मजूर, कामकरी, श्रमजीवी, शेतकरी, इत्यादि लोक रहात असत व निढळाचा घाम काढून पोटाची भूक भागवीत असत.

आणि पोट कुणाला नाहीं ? जगांतील सारे व्यवहार, सारी विषमता, साऱ्या आशानिराशा, सारे स्वार्थपरमार्थ, ध्येयं, लूटमार, भांडणें कशासाठीं होतात ?

केवळ पोटासाठींच ना ?

त्या खेड्यांत एक छोटेसें कुटुंब होतें. त्या कुटुंबांत अवघीं दोनच माणसें होतीं. नवरा व बायको–फिलीपाईन व बॉसीस–

फिलीपाईन रंगानें काळासावळा, हाडानें मजबूत, व शरीरानें दणकट असून मनानें प्रेमळ, निगर्वी, चौकस, व सदैव संतुष्ट रहाणारा असा होता. दिवसभर शेतांत मेहनत करावी, घामानें पैसा मिळवावा, व सुखानें मीठभाकर खावी हेंच त्याचें जीवन होतें. परमेश्वरावर मात्र त्याचा सारा भरवंसा होता. परमेश्वराबद्दल त्याला नितांत प्रेम, आदर व भक्ति वाटत असे. असलेल्या परिस्थितींत सुख मानून दुसऱ्याचीहि शक्य तों सेवा करावी हेंच त्याचें जीवितध्येय होतें.

आणि त्याची पत्नी बॉसीस !

तीहि मेहनती, प्रेमळ व आनंदी वृत्तीचीच होती. फिलिपाईन व बॉसीस !---दोघेंहि प्रेमळ, निगर्वी व कष्टाळू असून

असलेल्या परिस्थितींत सुख मानणारीं होतीं. दिवसभर काबाड-कष्ट करून रात्रीं सुखानें झोप घेणें हेंच त्याचें जीवन होतें.--

फिलीपाईन मनानें प्रेमळ असून दयाळूहि होता. जेवतांना दाराशीं भिकारी आल्यास तो त्याला कधींच परत पाठवीत नसे. आपल्या ताटांतील अर्धा हिस्सा तो भिकाऱ्यास वाढी व आपण उरलेलें खाई. दुसऱ्याचें सुख व समाधान पाहूनच त्याचें मन आनंदी होई. त्याचे घरांत मात्र पूर्ण दारिद्र्य होतें. पीठ आहे तर मीठ नाहीं, तेल आहे तर तूप नाहीं, डाळ आहे तर तांदूळ नाहीं, अशी त्याची रोजची स्थिती असे. पण त्यानें त्याविषयीं कधींच तक्रार केली नाहीं, अगर श्रीमंतीपुढें तोंडहि वेंगाडलें नाहीं. वेळ आली तर दोघेंहि उपाशी रहात असत व समाधान मानीत असत.

असाच एक दिवस होता. दुपारची वेळ. उन्हाळ्याचे दिवस. बाहेर ऊन मी म्हणत होतें. फिलिपाईन नुकताच आपल्या शेतावरील काम आटोपून घरीं आलेला होता, त्यानें हातपाय धुतले व तो दार लावून जेवावयास बसणार तोंच—

दारावर थाप बसली मात्र,—चटकन् फिलीपाईननें दार उघडलें. दाराशीं दोन भिकारी उभे होते. त्यांचे कपडे फाटलेले, केंस विस्कटलेले, चेहरे भुकेनें व्याकूळ झालेले, व शरीर निराशेनें खंगलेलें दिसत होतें. भिकाऱ्यांनीं अन्नाची याचना केली. फिलिपाईननें त्यांना प्रेमानें आंत बोलाविलें, कांबळ्यावर बसविलें व आपलें वाढलेलें ताट त्यांच्यापुढें सारलें व हंसत, नम्रपणें म्हटलें, 'माझ्या देवा, जेवा हं सावकाश'....भिकारी जेवूं

लागले. त्यांच्या चेहऱ्यावर तेज झळकूं लागलें; शरीरावर कांति तेजस्वी दिसूं लागली! फिलीपाईनला हें पाहून आश्चर्यच वाटलें.

भिकारी आणि इतके तेजस्वी ! कदाचित् परमेश्वर तर यांच्या रूपानें आला नाहीं ना ? पण तो माझ्यासारख्या दरिद्र्याचे घरीं जेवायला कसा येणार ?

घरांतील अन्न संपलेलें पाहून बॉसीसला वाईट वाटलें, 'आता मी यांना काय वाढूं ?' हाच विचार ती करीत होती. तिनें दोघांनाहि वाडगाभर दूध, दोनतीन ब्रेडचे तुकडे, व थोडासा मध वाढला.

दूध, ब्रेड व मध संपून गेलेलें होतें. जरा वेळानें तिनें पुन्हां वाडग्यांत पाहिलें मात्र आणि—

तिचा विश्वास तिच्या डोळ्यावरच बसेना ! मधाचें भांडें, दुधाचें भांडें व ब्रेडचे तुकडे जसेच्या तसेच होते. तिनें पुन्हां पुन्हां वाढावें, परंतु पुन्हां सारीं भांडीं भरलेलींच ! तिला आश्चर्यच वाटलें ! तिनें पुन्हां पाहिलें. पुन्हां सारीं भांडीं पूर्ण भरलेलींच !

भिकाऱ्यांचीं जेवणें आटोपलीं, त्यांनीं ढेकर पण दिला. 'जातें आम्ही' असें म्हणून ते जाऊं लागतांच 'आपलें नांव सांगाल काय ? आपण खरोखरच भिकारी आहांत काय ? आपलें तेजस्वी शरीर व सुंदर रूप पाहून मला आश्चर्य वाटतें.' फिलीपाईननें नम्रपणें विचारलें.

' फिलीपाईन, तूं आम्हांस ओळखलें नाहींस ! मी तुझा देव परमेश्वर ' ज्यूपीटर ' आहे व हा माझा दूत आहे. तुझ्या भक्तीची ' कसोटी ' पाहण्यासच आम्ही क्षणभर भिकारी बनलों. तूं कसोटीस उतरला आहेस. तूं स्वेच्छेनें वर माग. तुझें कुटुंब सुखी होईल ' असें ज्यूपीटर परमेश्वर म्हणाला.

' कृपा करा देवा व माझें आणि बॉसीसचें प्रेमांत अंतर पडूं देऊं नका, आणि तुमचा विसर मला केव्हांहि पडूं देऊं नका ! हीच विनंती आहे. ' हात जोडून फिलीपाईन म्हणाला.

' तथास्तु ! सुखी व चिरंजीव हो बेटा ! ' असें म्हणून ' ज्यूपीटर ' व देवदूत निघून गेले.

आणि फिलीपाईन आयुष्यभर सुखांत राहिला !

---

# देव दर्शन

तें एक लहानसें खेडें होतें. त्या खेड्यांत अनेक शेतकरी, कामकरी, मजूर व सावकार लोक रहात असत. सारे शेतकरी मोठे प्रेमळ, कष्टाळू व भोळे होते. त्याच गांवांत 'हरबा' नांवाचा एक शेतकरी रहात असे.

गांवाच्या बाहेर हरबाचें घर होतें. घर कसलें? एक लहानशी काटक्यांची झोपडीच होती ती. तिथेंच हरबाचें शेत देखील होतें. हरबाच्या घरीं जवळ जवळ आठ-दहा माणसें होतीं. तो स्वतः, त्याची पत्नी, त्याचीं चार मुलें, तीन मुली आणि त्याचा धाकटा भाऊ ग्यानबा. वाडवडिलांपासून हरबाकडे ही शेती चालत आलेली होती. शेती करावी, कष्ट करावे व सुखानें चार घास खावे अशी वाडवडिलांची शिकवण होती.

हरबाचें वय जवळ जवळ पस्तीस वर्षांचें होतें. शरीरानें तो काळासावळा, धडधाकट व ताकदवान् होता. मनानें प्रेमळ, आनंदी, थट्टेखोर व भोळा. हरबा सालस व सद्गुणी होता. त्याच्या अंगीं अनेक गुण होते. पण एक मोठा दोष मात्र होता. तो म्हणजे त्याचा आळस. तो अत्यंत आळशी होता. शेताचें कोणतेंहि काम तो स्वतः मन लावून कधींच करीत नसे.

बीं पेरणें, पीक कापणें, शेत नांगरणें-वखरणें, आडत फिरविणें, पिकाकडे लक्ष देणें, पहारा करणें इत्यादि सारीं कष्टाचीं कामें त्याची पत्नी गिरजा व त्याचा धाकटा भाऊ ग्यानबा हेच पहात असत व मधून मधून त्याचीं चार मुलें

व तीन मुली देखील त्यांना मदत करीत असत. परंतु स्वतः हरबा मात्र कधींच कष्ट करीत नसे. अत्यंत आळस त्याच्या अंगांत भरलेला असे. मग तो सारा दिवस काय करीत असे !—

सारा दिवस, सकाळ, संध्याकाळ व दुपार तो परमेश्वराचेंच भजन करीत असे. लवकर उठावें, नदीवर जाऊन स्नान करावें, हातांत चिपळ्या घ्याव्यात व एका मोठ्या लिंबाच्या झाडाखालीं ठेवलेल्या एका दगडाची पूजा करावी, आरती करावी, भजन करावें, गाणें गावें, फुलें वाहवींत व त्याची सेवा करावी हेंच त्याचें जीवनसर्वस्व होतें. दगडी देवाची पूजा, सेवा व अर्चा हीच त्याची इच्छा व ध्येय. आज ना उद्यां देव प्रसन्न होईल व सारें सुख मिळेल असें त्याला वाटत होतें. संसारांत त्याचें लक्षच नव्हतें. शेतीकडे तो नेहमींच दुर्लक्ष करी. शरीरास कोणतेहि कष्ट तो घेत नसे. सारा दिवस ईश्वरभजनांत व पूजनांत घालवी. बाकीची मंडळी मात्र कष्ट करीत असत व घाम ढाळीत असत.—

दिवसांमागून दिवस निघून गेले. वर्षांमागून वर्षें निघून गेलीं. हरबाचें भजन, पूजन, अर्चा, पोथी, चालूच होती. बारा वर्षें झालीं. देव प्रसन्न होण्याचीं चिन्हें दिसेनात. परमेश्वराचें दर्शन मिळेना. हरबा निराश झाला; परंतु परमेश्वरावर त्याची श्रद्धा होती, भाव होता, प्रेम होतें, विश्वास होता. त्यानें भक्ति सोडली नाहीं आणि एके दिवशीं रात्रीं—

तो दिवस पौर्णिमेचा होता. चंद्राचा पांढरा स्वच्छ, रमणीय व आल्हाददायक प्रकाश पडलेला होता. रात्रीची वेळ होती. सर्वत्र शांतता होती. गार वारा वहात होता. पवित्र वातावरण. हरबा आपल्या देवाच्या जवळ बसला होता. देवाच्या मूर्तीला हात लावून, नमस्कार करून तो म्हणाला, "देवा, केव्हां रे दर्शन देशील, केव्हां सुख देशील? आज बारा वर्षे झालीं, सुख नाहीं, पीक पुरेसें येत नाहीं, पाऊस पडत नाहीं, पोरेंबाळे उपाशीं रहातात, शेत डोलत नाहीं, पैसा मिळत नाहीं, दया कर माझ्यावर. प्रसन्न हो, दर्शन दे!"—असें म्हणून त्यानें देवाच्या पायांवर मस्तक ठेवलें मात्र! तोंच....

मोठा आवाज झाला. अधिक तेजस्वी प्रकाश पडला व कुणी तरी बोलूं लागलें. ती आकाशवाणी होती. "हरबा, आज बारा वर्षें झालीं. तूं माझी पूजा केली, भक्ति केली. मी तुझ्या निस्सीम प्रेमामुळें तुझ्यावर प्रसन्न झालेलों आहें पण लक्षांत ठेव, सुख हें दैवानें मिळत नाहीं, तें कष्टानें मिळवावें लागतें. मेहनत केल्याशिवाय, कष्ट केल्याशिवाय व शरीर झिजविल्याशिवाय, रक्ताचें पाणी केल्याशिवाय व निढळाचा घाम काढल्याशिवाय, तुला खरें सुख व पैसा-मिळणार नाहीं. आजपासून तूं स्वतः शेतांत जात जा, शेत नांगरीत जा, बीं पेरीत जा, कष्ट करीत जा, आपल्या भावाला मदत कर, पहारा करीत जा, जमीन खणून नांगरीत जा. आजपासून जवळ जवळ एक वर्षानेंच तुला

तुझ्या शेतांत पैशाचा हंडा सांपडेल व अत्यंत सुख मिळून माझेंहि दर्शन होईल. जा, आळस सोडून कष्ट व सेवा कर ! ”—

हरबा आनंदीत झाला. दुसऱ्याच दिवसापासून तो शेतांत जाऊन कष्ट करून घाम काढूं लागला; बीं पेरणें, शेत नांगरणें, वखरणें, पिकाची देखरेख करणें, पहारा करणें, सारीं कामें तो स्वतः करूं लागला. त्याचा आळस नाहींसा झाला. मनाला शांतता व प्रसन्नता मिळाली. सर्वांनाच आनंद झाला. सारे प्रेमानें एके ठिकाणीं येऊन शेताची देखरेख व मशागत करूं लागले.

पावसाळा सुरू झाला. मुसळधार पाऊस पडूं लागला. पेरणी झाली वर्ष निघून गेलें आणि हरबाचें शेत डोलूं लागलें. हिरवींगार पिकें डोलूं लागलीं. सृष्टिदेवता प्रसन्न झाली— आपल्या त्या सुंदर शेताकडे पाहून हरबा मनांत म्हणाला— “किती सुंदर शेत आहे माझें ! कसें डोलतें आहे वैभवानें या वैभवापुढें सारा पैसा देखील तुच्छ आहे. परमेश्वराचीच ही कृपा. माझें हें शेत पाहून असें वाटतें, जणूं परमेश्वरच हंसत आहे ! ” अत्यंत आनंद झाला हरबाला तोंच पुन्हां आकाशवाणी होऊन एक अस्पष्ट मूर्ति तिथें उभी राहिली व बोलूं लागली— “ हरबा, हें पीक, हें डोलतें शेत म्हणजेच माझें स्वरूप आहे. जो माणूस आळस सोडून स्वतः मेहनत करील

त्यालाच माझें दर्शन सदैव होत राहील. हें पीक हाच तुझा पैशाचा हंडा. हेंच माझें दर्शन व हेंच तुझें वैभव होय. शेताची मशागत करणें, अखील मानवांना अन्न पुरविणें, हीच खरी ईश्वरसेवा होय आणि तूंच खरा परमेश्वर व अन्नदाता आहेस. कष्ट कर व हमेशा सुखी रहा !"

हरबानें भक्तिभावानें नमस्कार केला.

---

म. ले. सं. पुणे, [illegible]
क्र. ५८३० नों. दि. [illegible]
वि. [illegible]

IRBK-0105330

IRBK-0105330